ePaper

**बाळासाहेब जाण्याची वाट पाहत होते उद्धव ठाकरे; रामदास कदम यांचा खळबळजनक आरोप**

वर्ष - 8 I अंक - 215 | UDYAM-MH-26-0158827
www.mahaenews.com
महाईन्यूज ™



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना शिवमय शुभेच्छा



बुधवार, दिनांक 19 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी

# धनंजय मुंडे राजीनामा देणार?

### अजित पवार यांच्या सूचक वक्तव्याने चर्चांना उधाण

**I पुणे I महाईन्यूज**

**महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी आणि महत्त्वाची माहिती समोर येत आहे. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंचं सतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणवारुन राज्याचे अन्न-नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर विरोधकांकडून गंभीर आरोप केले जात आहोत. विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने केली जात होती. अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. त्यामुळे आता धनंजय मुंडे खरंच मंत्रिपदाचा राजीनामा देणार का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. "सिंचन घोटाळ्याच्या आरोपावेळी मी राजीनामा दिला होता. त्यामुळे राजीनामा द्यायचं की नाही हे धनंजय मुंडे यांनी ठरवावं", असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.**



"आरोप सिद्ध झाला किंवा चौकशीमध्ये देखील सूई तिथपर्यंत पोहोचली तरंच आपण कारवाई करणार ना? आता तुम्ही प्रश्न विचारला की, 2010च्या दरम्यान तुमच्यावर सिंचनाचे आरोप झाले. त्यावेळी तुम्ही राजीनामा दिला. जो तो स्वत:चा निर्णय घेतो. त्यावेळेस माझ्या सद्विवेक बुद्धिला ते पटलं नव्हतं", असं अजित पवार आज पत्रकार परिषदेत म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता धनंजय मुंडे खरंच मंत्रिपदाचा राजीनामा देतील का? असा प्रश्न उपस्थित होतोय.

### मुंडेंनी 3 दिवसांपूर्वीच घेतली अजित पवारांची भेट

विशेष म्हणजे तीन दिवसांपूर्वी धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांच्या मुंबईतील शासकीय निवासस्थान असलेल्या 'देवगिरी' बंगल्यावर जावून भेट घेतली होती. धनंजय मुंडे यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल हे देखील 'देवगिरी' बंगल्यावर दाखल झाले होते. यावेळी तीनही नेत्यांमध्ये महत्त्वाची चर्चा झाल्याची माहिती आहे. पण नेमकी काय चर्चा झाली ते अद्याप गुलदस्त्यात आहे. या दरम्यान, अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचा चेंडू हा त्यांच्यात कोर्टात दिला आहे. त्यामुळे आता धनंजय मुंडे काय भूमिका घेतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

### सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीने खळबळ

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची 9 डिसेंबरला अपहरण करुन निर्घृण हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड याला सीआयडीने अटक केली आहे. तो सध्या जेलमध्ये आहे. तसेच इतर आरोपींच्या देखील मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. या प्रकरणी भाजप आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले. विरोधकांनी देखील मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

---

## सरसकट पाडापाडीचे समर्थन कदापि नाही!

### कुदळवाडीतील अतिक्रमण कारवाई: प्रशासनाचे आभार, भाजपा आमदार महेश लांडगे यांची स्पष्ट भूमिका

### 'या' कारवाईमुळे भूमिपुत्र, उद्योजकांचेही नुकसान

**I पिंपरी I महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने कुदळवाडी-चिखली परिसरात अतिक्रमण कारवाई केली. इंद्रायणी नदी प्रदूषण, शहर आणि देशाची सुरक्षेचया मुद्यावर अवैध भंगार व्यावसायिक आणि बेकायदेशीर धंद्यांवर केलेल्या कारवाईचे आम्ही समर्थन करीत आहोत. मात्र, सरसकट कारवाईमुळे लघु उद्योजक आणि भूमिपुत्रांचेही नुकसान झाले आहे. याचे समर्थन कदापि करणार नाही. याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे लक्ष वेधणार आहोत, अशी स्पष्ट भूमिका भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी मांडली आहे.**




पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने कुदळवाडी-चिखली भागात भारतातील सर्वात मोठी अतिक्रमण कारवाई केली. पहिल्या दिवशी दि. 8 फेब्रुवारी ते 17 फेब्रुवारी 2025 दरम्यान एकूण 4 हजार 111 अतिक्रमणांवर कारवाई झाली. यामध्ये एकूण 3 कोटी 60 लाख 58 हजार 746 चौरस फूट क्षेत्रावरील म्हणजे सुमारे 827 एकर क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आले. या कारवाईमुळे रस्ता आणि आरक्षण असलेले महापालिका मालकीचे सुमारे 100 एकर क्षेत्र अतिक्रमण मुक्त झाले आहे. आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडून कुदळवाडी-चिखली परिसरातील अनधिकृत भंगार व्यावसायिक, अवैध धंदे आणि इंद्रायणी नदी प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करावी, अशी भूमिका आम्ही सातत्याने मांडत आलो आहोत. इंद्रायणी प्रदूषण, वायू व ध्वनी प्रदूषण, अवैध धंदे, वाढती गुन्हेगारी, वाहतूक कोंडी आणि आगीच्या घटना यांना प्रतिबंध करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदर कारवाईसाठी महापालिका प्रशासन, पोलीस प्रशासनाला पाठबळ दिले.

### म्हणून जाहीर भूमिका मांडली नाही!

अनधिकृत भंगार व्यावसायिक आणि अवैध धंद्यांवर यासह रस्ते आणि आरक्षणांमधील अतिक्रमणावर कारवाई करण्याचे ठरले होते. त्या कारवाईचे आम्ही जाहीर समर्थन करीत आहोत. परंतु, प्रशासनाने केलेल्या सरसकट कारवाईमुळे 559 लघु उद्योजक आणि भूमिपुत्रांचे नुकसान झाले आहे. याचे आम्ही कदापि समर्थन करणार नाही. याबाबत महापालिका प्रशासन आणि राज्य सरकारकडे दाद मागणार आहोत. दि. 7 फेब्रुवारी 17 फेब्रुवारी 2025 दरम्यान अतिक्रमण कारवाई दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न किंवा धार्मिक तेढ निर्माण होईल. या कारणास्तव 'सोशल मीडिया' किंवा जाहीरपणे भूमिका व्यक्त न करता प्रशासनाला सहकार्य करण्याचे ठरले होते. त्यामुळे आता स्पष्ट भूमिका मांडत आहोत, असेही आमदार लांडगे यांनी 'सोशल मीडिया'द्वारे मत व्यक्त केले आहे.

# निवडून येणाऱ्या रोहित पवारांची स्पेस संपली!

## रोहित पवारची हत्येच्या आडून राजकारण करणारी टोळी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होऊन जवळपास दोन महिन्यांचा कालावधी लोटला. मात्र, या प्रकरणातील सातव्या आरोपीचा अद्यापपर्यंत शोध लागला नसून त्याचा शोध पोलिस घेत आहेत. तर या प्रकरणी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांकडून सातत्याने न्यायाची मागणी होत आहे.**



त्या सर्व घडामोडीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज बीड येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी संतोष देशमुख यांच्या पत्नी, आई आणि मुलीशी संवाददेखील साधला. त्यावेळी सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकादेखील केली. त्या टिकेनंतर विविध राजकीय मंडळींकडून प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली असून पुण्यात ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी सुप्रिया सुळे यांच्या बीड दौऱ्याचा प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधताना चांगलाच समाचार घेतल्याचे पाहण्यास मिळाले.यावेळी लक्ष्मण हाके म्हणाले,"मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची खासदार सुप्रिया सुळे यांनी भेट घेतली, त्याबद्दल सुप्रिया सुळे यांचं स्वागत करतो, पण मी कायम बेगडी पुरोगामी नेता म्हणून शरद पवार यांचा उल्लेख करीत आलो आहे आणि त्यांचाच बेगडी पुरोगामीत्त्वाचा शिक्का सुप्रिया सुळे या त्यांच्या वर्तनातून दाखवून देत आहेत. त्याबद्दल सांगायचे झाल्यास, सुप्रिया सुळे यांच्या बारामती लोकसभा मतदारसंघातील भोर तालुक्यातील विक्रम दादासाहेब गायकवाड या तरुणाची हत्या झाली आहे. ती हत्या सुप्रिया सुळे यांना दिसली नाही. तसेच काही दिवसांपूर्वी माऊली सोट या तरुणाची हत्या झाली, ती हत्यादेखील त्यांना दिसली नाही. त्या सर्व घटना लक्षात घेतल्यानंतर शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांना इतर जातींमधील हत्या दिसल्या नाहीत, तर या हत्येच्या अडून राजकारण करणारी टोळी असल्याचं सांगत त्यांनी पवार कुटुंबावर टीका केली."मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्यात निवडणुकीच्या काळात सभा किंवा दौरे केले नाहीत. त्यांना स्पेस मिळत नव्हती, पण सुरेश धस यांचा वापर केल्याने देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी बीडमध्ये दरवाजा उघडला आहे, असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्या प्रश्नावर ते म्हणाले, "विधानसभा निवडणुकीत रोहित पवार हे हजार पंधराशे मतांनी निवडून आले आहेत, त्यामुळे त्यांचीच स्पेस संपून गेली असून रोहित पवार हे कसेबसे निवडून आले आहेत. तर बीड जिल्ह्यात महायुतीचे आमदार निवडून आले आहेत, त्यामुळे बीड जिल्हा कोणाचा आहे आणि देवेंद्र फडणवीस यांना स्पेस शोधायची काय गरज आहे, असा सवाल उपस्थित करीत ते पुढे म्हणाले, "उत्तमराव जानकर, नारायण पाटील ही मंडळी दहा पंधरा हजार मतांनी निवडून आली आहे.

### फडणवीस यांच्यावर टीका

तर पंधराशे मतांनी निवडून येणाऱ्या रोहित पवारांची स्पेस संपली आहे, हे पाहून घ्या; अशा शब्दात रोहित पवार यांच्यावर त्यांनी निशाणा साधला. सर्व घडामोडीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज बीड येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी संतोष देशमुख यांच्या पत्नी, आई आणि मुलीशी संवाददेखील साधला. त्यावेळी सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकादेखील केली.राजकीय मंडळींकडून प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली असून पुण्यात ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी सुप्रिया सुळे यांच्या बीड दौऱ्याचा प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधताना चांगलाच समाचार घेतल्याचे पाहण्यास मिळाले.यावेळी लक्ष्मण हाके म्हणाले, "मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची खासदार सुप्रिया सुळे यांनी भेट घेतली, पण मी कायम बेगडी पुरोगामी नेता म्हणून शरद पवार यांचा उल्लेख करीत आलो आहे .

# काही दिवसात कचरा डेपोचे चित्र बदलले?

## शिरूर नगरपरिषदेस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची नोटीस

। मावळ ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिरूर नगरपरिषद कडून कचऱ्याचे संकलन व विल्हेवाट शास्त्रशुध्द पध्दतीने केले जात नसून या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा वतीने पालिकेस नोटीस बजाविण्यात आली असल्याचे मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष महिबूब सय्यद यांनी पत्रकार परिषदेत सांगितले .पत्रकार परिषदेला शिरुर प्रवासी संघाचे अध्यक्ष अनिल बांडे , सामाजिक कार्यकर्ते रवींद्र सानप , मनसेचे तालुका संघटक अविनाश घोगरे ,शहराध्यक्ष आदित्य मैड आदी उपस्थित होते.**




सय्यद म्हणाले की महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा वतीने शिरुर नगरपरिषदेच्या घन कचरा संकलन केंद्रावर शास्त्रशुध्द पध्दतीने कचरा विल्हेवाट न लावता कचरा जाळल्याने परिसरात वायू प्रदूषन होत असल्याची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ व जिल्हाधिकारी पुणे यांच्या कडे करण्यात आली होती . या तक्रारीची दखल घेत प्रदूषण मंडळाच्या आधिकारी सुषमा कुंभार यांनी कचरा संकलन केंद्रास भेट देवून तक्रारीची शहानिशा केली होती व स्थानिक नागरिकांशी चर्चा केली .त्यानंतर या बाबतचा कायदेशीर कार्यवाहीचा अहवाल उपप्रादेशिक संचालक महाराष्ट्र प्रदूषण मंडळ पुणे यांना जानेवारी २०२५ दिला होता . त्या अनुषंगाने जे. एस. साळुंखे प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुणे यांनी शिरूर नगरपालिकेस नोटीस बजावली आहे.या संदर्भात सन -१९७४ च्या कलमानुसार पाणी व वायू प्रदूषण नियंत्रण नियमावली व सन -१९८१ च्या कायदानुसार पालिकेस नोटीस बजाविण्यात आली आहे . घन कचराचे व्यवस्थापन व विल्हेवाट लावण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था अथवा त्यांनी नेमून दिलेल्या एजन्सीची आहे .सय्यद म्हणाले प्रादेशिक संचालकांनी दिलेल्या नोटीसीत पालिकेस आपणा विरोधात कारवाई का करु नये असे म्हटले असून भविष्यातील घनकचरा प्रक्रियेवरील आढावा सादर करुन त्यावरील उपाययोजना संदर्भातील अहवाल १५ दिवसात सादर करावा अथवा कारवाई करण्यात येईल असे म्हटले आहे .आम्ही याबाबत सन २००७ पासून पालिकेकडे तक्रार करुन ही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले असून शासनाचा निधीचा दुरुपयोग पालिका करीत आहे .

### 15 दिवसात कचरांचे ढीग कमी होतील

घनकचरात बॅटरीसह अन्य घटकांचा समावेश होतो .कचराचे ढिगावर ढिग साचून मिथेन गॅस तयार होतो उन्हा मुळे बॅटराच्या स्फोट होतो व कचरा पेट घेतो . पालिका घनकचरा दालमिया सिमेंट कंपनीला पाठवते व कंपनी त्यावर प्रक्रिया करते . कचरावर प्रक्रिया करण्यासाठीची मशिनरी खरेदी करण्याचा प्रस्ताव ६ महिन्यापूर्वी करण्यात आला असून त्यास तांत्रिक मान्यता मिळून निधी मंजूर झाला आहे. शासनाची मान्यता मिळाल्यावर ही मशिनरी खरेदी करण्यात येणार आहे .१५ दिवसात कचरांचे ढीग कमी होतील याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे .

## कुदळवाडीत सात दिवसांच्या

# धडक कारवाईनंतर मोहीम स्थगित!

### 825 एकर जागेतील 4 हजार 111 पत्राशेड 'भुईसपाट'

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चिखली येथील कुदळवाडी परिसरात आरक्षित जागेवरील अनधिकृत बांधकामे व पत्राशेडवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने शनिवार (दि.८) पासून धडक कारवाई सुरू केली. ती कारवाई शुक्रवार (दि.१४) पर्यंत सलग सात दिवस सुरू होती. या करवाई मोहिमेत तब्बल ८२५ एकर जागा रिकामी करण्यात आली असून, तब्बल ४ हजार १११ भंगार गोदामे, लघुउद्योग व इतर आस्थापना भूईसपाट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा निर्मनुष्य परिसर भयान दिसत आहे. ही कारवाई स्थगित करण्यात आली आहे.**



पहाटे पाच वाजल्यापासून महापालिका व पोलिस विभागांची यंत्रणा एकत्रित येऊन ही कारवाई मोहीम सक्तीने राबवित होती. जेसीबी, पोकलेन, क्रेन, कटरच्या सहाय्याने अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदाम, दुकाने आणि पत्र-ाशेड तोडण्यात आले. पहिल्या दिवशी खरबदारी म्हणून त्या भागांतील इंटरनेट सुविधा बंद करण्यात आली होती. तेथील प्रमुख व्यावसायिक व पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

व्यावसायिक, लघुउद्योजक, राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, मंत्री, पदाधिकारी व माजी नगरसेवकांचा दबाव झुगारून ही कारवाई सलग सात दिवस करण्यात आली. त्यासाठी महापालिकेने स्वतंत्र पथकच तयार केले होते.

#### 825 एकरचा परिसर अतिक्रमणमुक्त


या कारवाईत तब्बल ४ हजार १११ आस्थापना पाडण्यात आल्या. त्यात एकूण ८२५ एकरचा परिसर अतिक्रमणमुक्त करण्यात आला आहे. रस्त्यासाठी आरक्षित असलेल्या जागेत डांबरीकरण करण्यात येत असून, इतर सेवा व सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

## पाणी पुरवठा बंदचा बनावट 'एसएमएस' तुमचा खिसा करेल रिकामा

### मेसेज मधील फाईल ओपन करू नका; पोलिसांचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड मनपा पाणी पुरवठा विभाग यांच्या नावाने पाणी पुरवठा बंद करण्यात येत असल्याचे बनावट एसएमएस पाठवण्याचे प्रकार शहरामध्ये घडत आहेत. नागरिकांनी अशा बनावट एसएमएसकडे दुर्लक्ष करावे. तसेच बनावट एसएमएस पाठवणाऱ्या क्रमांकाची तक्रार सायबर पोलिसांकडे करावी, असे आवाहन पिंपरी चिंचवड मनपा आणि पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. मेसेज मधील एपीके फाईल आणि दिलेल्या नंबरवर फोन न करण्याचा सल्ला पोलिसांनी दिला आहे.**




पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात सध्या ज्या मालमत्तेची पाणीपट्टी थकीत आहे, अशा मालमत्तेचे नळकनेक्शन तोडण्याची कारवाई सुरू आहे. याशिवाय थकीत पाणीपट्टी भरण्याचे आवाहन मनपाच्या माध्यमातून 'एसएमएस' द्वारे व इतर माध्यमातून करण्यात येत असते. परंतु सध्या मनपाच्या पाणी पुरवठा विभागाच्या नावाने विविध मोबाईल क्रमांकावरून बनावट एसएमएस पाठवण्याचे प्रकार सुरू आहेत. अशा एसएमएसकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या पाणी पुरवठा विभागाच्या नावाने प्राप्त होणाऱ्या बनावट एसएमएस बाबत तक्रार करण्यासाठी नागरिक तात्काळ जवळचे पोलीस ठाणे, सायबर पोलीस ठाणे अथवा टोल फ्री क्रमांक १९०३ यावर संपर्क करू शकतात.

#### बँक खात्यातून पैसे काढून नागरिकांची फसवणूक


पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना पाठवण्यात येणारे बनावट एसएमएस देवेश जोशी या नावाने आहेत. या एसएमएसमध्ये नमुद करण्यात आले आहे की, 'प्रिय ग्राहक मागील महिन्यातील बिल न भरल्यामुळे रात्री ९ वाजता पाणी पुरवठा बंद करण्यात येणार आहे. कृपया याबाबत तात्काळ खालील नंबरवर कॉल करा.'

याशिवाय, व्हॉट्सअपद्वारे पाठवण्यात येणाऱ्या एसएमएसमध्ये एक एपीके फाईल पाठवली जात आहे. ही एपीके फाईल डाऊनलोड केल्यानंतर मोबाईल फोनमधील डेटा, बँक खात्याची माहिती, पासवर्ड अशा स्वरुपाच्या माहिती मिळवून बँक खात्यातून पैसे काढून नागरिकांची फसवणूक केल्याचे प्रकार घडत आहेत. अशा आशयाचा कोणताही एसएमएस मनपाकडून पाठवण्यात येत नसल्याने नागरिकांनी घाबरून न जाता तात्काळ असा एसएमएस येताच तक्रार करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. पालिका पाणी पुरवठा विभागाकडे संपर्क साधा.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या नावाने बनावट 'एसएमएस' वारंवार विविध क्रमांकावरुन नागरिकांना पाठवण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. नागरिकांनी फसवणूक करणाऱ्या एसएमएसकडे दुर्लक्ष करुन त्यामध्ये नमुद करण्यात आलेल्या क्रमांकावर संपर्क करू नये. तसेच बनावट एसएमएसद्वारे पाठविण्यात येणारे एपीके डाऊनलोड करू नये. बनावट एसएमएस पाठवणाऱ्यांबाबत मनपा कडून सायबर पोलिसांना माहिती देण्यात येणार आहे. नागरिकांनी देखील त्यांना बनावट एसएमएस प्राप्त झाल्यास त्याबाबत सायबर पोलिसांकडे तक्रार करावी.
>
> **– शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड मनपा

> अशा प्रकारच्या फसवणुकीच्या प्रकारापासून सावध रहा. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात अथवा सायबर पोलीस ठाण्यात संपर्क करा.
>
> **– संदीप डोईफोडे,** पोलीस उपायुक्त (गुन्हे)

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नामाविषयी शुद्ध भाव आवश्यक

ईश्वर सर्वांचा उत्पन्नकर्ता आहे, रक्षणकर्ता आहे, तसेच संहारकर्ताही आहे. परंतु तरी त्याला न्यायी आणि प्रेमी म्हणतातच, कारण तो निःस्वार्थी आहे. म्हणजे प्रेम हे निःस्वार्थतच असते. आपल्याला खरे म्हटले म्हणजे आपला स्वार्थच नडतो. आपला स्वार्थ प्रेमाच्या आड येतो. आपले विषय ईश्वर-प्रेमात व्यत्यय आणतात. ज्या ज्या गोष्टी या प्रेमाच्या आड येतात त्यांचा त्याग नको का करायला ? तेव्हा विषयांची आसक्ती, त्यांच्यावरचे प्रेम, नाहीसे झाले पाहिजे. आपण ईश्वराचे, संतांचे झाले पाहिजे. त्याशिवाय आपल्याला कशाचीही गरज वाटता कामा नये. एकाच मातीचा जसा गणपती, बाहुले किंवा मडके होते, त्याप्रमाणे ईश्वरही आपल्या भावनेप्रमाणे होतो. म्हणूनच आपला भाव नेहमी शुद्ध आणि निःस्वार्थी असावा. मुळाशी पाणी घातले की झाड वाढते, पण आपण मुळापर्यंत जातच नाही. तेव्हा, भाव शुद्ध कसा होईल ते पाहावे. उदाहरणार्थ, एकादशीच्या दिवशी उपवास करायचा एवढेच आपल्याला ठाऊक असते. पण एक गृहस्थ एकादशीला भगवंताचे नामस्मरण करायचे सोडून बारा वाजेपर्यंत अंघोळ न करता अंगण, मोरी झाडत बसला ! असे आमुचे चुकते. थोडक्यात म्हणजे, आपल्याला मुळात काय पाहिजे हेच कळत नाही. कावीळ झाली म्हणजे डोळ्याला खरे रूप कसे कळणार ? म्हणून, ज्याचे डोळे साफ आहेत तो सांगेल त्याप्रमाणे वागावे. याकरिता गुरु-आज्ञा प्रमाण मानून आपण वागत जावे. नाम श्रद्धेने आणि शुद्ध भावाने घ्यावे म्हणजे मनात शंका येत नाहीत. या भगवंताच्या नामाची गोडी एकदा लागली म्हणजे भगवंत नाही आपल्याला सोडीत. नामाशिवाय दुसरे सत्यच नाही अशी दृढ भावना झाली पाहिजे. जितकी देहबुद्धी अधिक तितके नाम अधिक घेतले पाहिजे. आज इतके दिवस आपण विषयाचे चिंतन केले, त्याने आपल्या हातात काय आले ? नामासारखे सोपे साधन नाही. प्रापंचिक लोक असे म्हणतात की, "विषयाचा अनुभव तात्काळ येतो, पण भगवंताचा अनुभव हा अनुमानाचा आणि श्रद्धेचा आहे." हे त्यांचे म्हणणे मला पटते. प्रापंचिक लोक प्रपंच सोडीत नाहीत याचे मला नवल वाटत नाही. पण ते सुख चिरकाल टिकणारे आहे ही समजूत करून घेऊन त्यामध्ये रमतात, याचे मला वाईट वाटते. मी असे म्हणतो की, तुमच्या अनुभवाप्रमाणे जे खरे आहे, तेवढेच तुम्ही खरे माना. विषयाच्या ध्यासापासून सुख नाही असे वाटू लागले म्हणजे नामाची गोडी येईल. आपल्या देहावर आपली सत्ता नाही, आपल्या पैशावर आपली सत्ता नाही, आपल्या माणसांवर आपली सत्ता नाही. म्हणून आपले कर्तव्य तेवढे करावे,.

**बोधवचनः- भगवत्प्राप्ती हे आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून आपण नेहमी त्याच्याभोवती फिरत असावे; म्हणजेच त्याच्या अनुसंधानात असावे.**

# अमोल कोल्हेंचा फेक नॅरेटिव्ह, विकी कौशलमुळं चव्हाट्यावर!



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**गेल्या काही दिवसात शंभूराजांच्या म्हणजेच छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिका साकारणारे दोन प्रमुख अभिनेते.. पहिले डॉ. अमोल कोल्हे आणि आत्ताच प्रदर्शित झालेला विकी कौशल चा छावा! अमोल कोल्हेची तुलना विकी कौशल च्या छाव्या बरोबर करायची झाली, तर विकीनं अमोलचं थोबाड फोडलं आहे, असंच म्हणावं लागेल.**

### राजकीय स्वार्थासाठी खोटा नॅरेटिव्ह

डॉ.अमोल कोल्हे हा कोणतीही राजकीय भूमिका नसलेला डबल ढोलकी नेता ! भाजपाने थारा दिला नाही म्हणून हळूच शरद पवारांच्या गोटात शिरलेला.. आणि टीव्हीच्या मालिकांमधून छत्रपती शिवाजी आणि शंभूराजांच्या भूमिका साकारून मिळालेल्या प्रसिद्धीच्या जोरावर स्वतःचा राजकीय स्वार्थ शोधून राजकीय दुकानदारी करणारा !

### अमोल कोल्हे इतिहास माफ करणार नाही!

अमोल कोल्हे यांनी सोयीचे होईल तसेच छत्रपती शंभूराजेंचे चित्र दाखवले. त्यांनी मूळ इतिहासाची चिरफाड केली आणि जाती जातीत द्वेष पसरवून आपल्या राजकीय पक्षाला त्याचा फायदा कसा होईल, हेच पाहिले. स्वतःला तथाकथित हिंदू म्हणवून घेत अमोल कोल्हे यांनी आपल्या 'नकली' भूमिकांचा त्याचा राजकीय फायदयासाठी वापर करून घेतला. क्रूरकर्मा औरंग्याने केलेले अत्याचार सहन केले, मात्र छत्रपती शंभूराजेंनी हिंदू धर्म सोडला नाही. परंतु अमोल कोल्हे यांनी स्वतःला हिंदुत्ववादी समजून त्याच हिंदू धर्मातील जाती-जातींमध्ये द्वेषभावना उत्पन्न केली. स्वतःच्या मतदारसंघांमध्ये मराठा विरुद्ध माळी समाज असा अघोषित संघर्ष पुकारून त्यांनी राजकीय पोतडी तर भरली, पण विजय मिळवून मतदार संघाशी प्रतारणा केली. निवडून आल्यानंतर मतदार संघाकडे पाठ फिरवून हिंदूंच्या समारंभांना अनुपस्थित राहण्याचे षडयंत्र रचले. अमोल कोल्हे हे कधी 'नमाजवादी' झाले, हे कळलेच नाही !

### व्होट बँकेचे लांगुलचालन

अमोल कोल्हे यांनी कितीही इन्कार करू देत पण त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये व्होट बँकेचे लांगुलचालन केले. त्यासाठी वेळप्रसंगी हिंदुत्वाला तिलांजली दिली, तर कधी शिवरायांचा आणि शंभूराजांचा चुकीचा इतिहास





मांडला, त्या आधारावरच विजय प्राप्त केला, हे आता प्रत्येक मतदार जाणतो आहे.अमोल कोल्हे यांना एवढेच सांगावे वाटते, की तुमचा हा द्रोह संपूर्ण शंभूभक्त लक्षात ठेवतील आणि म्हणून इतिहास तुम्हाला कधीही माफ करणार नाही. राजकीय विजय हा तात्पुरता असतो, आणि पुढील निवडणुकीत हेच मतदार तुमचा वचपा काढतील, उट्टे काढतील याची खात्री आहे.

### नेमकं काय दाखवलं आहे 'छावा' मध्ये

अलौकिक धाडस, शौर्य, निष्ठा, पराक्रम, अफाट ताकद, गनिमी काव्याच्या रूपानं दिलेला अतुलनीय लढा आणि शेवटी या संघर्षाची गद्दारीमुळं किंवा फितुरीमुळं झालेली शोकांतिका म्हणजेच सध्या गाजत असलेला शंभूराजांच्या जीवनावर आधारित चित्रपट छावा ! हे हिंदवी स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा म्हणणारा छावा म्हणजेच पराक्रमी योद्धा शंभूराजा.. छत्रपती शिवाजी नावाचा सिंह होता, त्याचा शंभूराजा म्हणजेच संभाजीराजे नावाचा छावा होता, म्हणून हे हिंदवी स्वराज्य झाले. लढवय्या मराठ्यांचा इतिहास.. क्रूरकर्मा औरंग्याचा इतिहास पाहायचा असेल तर या चित्रपटातून अनुभवता येईल. अमोल कोल्हे यांच्या टीव्हीवरच्या मालिका पाहून आता उशिरा का होईना पण चीड येऊ लागली आहे, त्यांनी पूर्णपणे खोटा इतिहास सादर केल्याचे स्पष्ट झाले आहे.

### विश्वासघात पाहवत नाही

औरंग्याच्या क्रूर वागण्यानं, त्याच्या विश्वासघातानं आपलं रक्त सळसळावं, अशी ही छावाची थीम.. संपूर्ण इतिहास हा रक्तरंजितच होता आणि तो तसाच दाखवला गेला, हे जास्त महत्त्वाचं. आपल्या राजाचं व्यक्तिमत्त्व हे एका सिंहाला मागं टाकेल याच स्वरुपाचं होतं आणि शंभूराजांची भूमिका यशस्वीपणे पार पाडणाऱ्या विकी कौशलनं पडद्यावर ते त्याच प्रकारे सादर केलेलं आहे. तो आवेश, ती मुद्रा, तो संताप आणि प्रसंगी तो हळवेपणा.. सगळं सगळं त्यानं अगदी मनोभावे आणि हृदयापासून उत्तमरीत्या साकारलंय.. शंभूराजे पुढील पिढीच्या लक्षात राहतील, याची संपूर्ण तजवीज त्यानं करून ठेवली आहे. अगदी सुरुवातीला बुऱ्हाणपूरच्या लढाईत महाराज एका लहान मुलाला वाचवून त्याच्या आईच्या स्वाधीन करतात असा एक भावनिक प्रसंग आहे. हा ज्याप्रकारे विकी कौशलनं साकारलाय,ते पाहून महाराणी सईबाई आणि शंभूराजे यांच्या नात्यातला तो ओलावा आपल्याला सहज भावनिक करून टाकतो, अचूकपणे हळवेपणा टिपला गेला आहे.

### मराठी कलाकारांच्या योग्य भूमिका

रश्मीका स्वराज्याची महाराणी म्हणून अगदी ठसठशीत उठून दिसली आहे. तिचे दागिने, साड्यांची स्टाईल, मोठाले पाणीदार डोळे मोठ्या पडद्यावर बघताना नकळत आपण येसूबाईंना सुद्धा एक मुजरा करतो. आपल्या मराठी कलाकारांनी त्यांची त्यांची पात्रे यशस्वीपणे पार पाडलेली आहेत. तीन तासांच्या चित्रपटात जितकं काम त्यांना मिळालं, तितकं त्यांनी चोख बजावलं आहे. संधीचं सोनं केलं आहे. कवी कलश आवर्जून लक्षात राहतात. बॉलीवूड चित्रपट म्हटला की त्याची तुलना ही भव्य दिव्य अशा चित्रपटांशी होणारच. आनंद या गोष्टीचा वाटतो की 'छावा' सुद्धा या तुलनेत कुठच कमी पडलेला नाही. भव्य-दिव्य सेट्स, कलाकारांचे गेट अप ते व्हीएफएक्स एफेक्ट्स हे सगळं अगदी उत्तमपणे जुळून आलेलं आहे. शंभूराजे पकडले गेले तेव्हापासून पुढचा चित्रपट हळव्या मनाच्या रसिकांना नक्कीच भावणार नाही. त्यांचा संताप होईल. वेळप्रसंगी तीळपापड देखील होईल. क्रूरकर्म्या औरंग्याचे विकृत आणि विक्षिप्त आदेश, त्यानुरूप साखळदंडानं बांधून ठेवलेल्या शंभूराजाचा सुरू असलेला छळ अजिबात बघवत नाही. पण, थिएटर मधून बाहेर पडणाऱ्या लोकांचे ओले झालेले डोळे, हमसून हमसून दिल्या जाणाऱ्या हुंदक्यांचे आवाज आणि एक भयाण शांतता ही शेवट कशाप्रकारे दाखवला गेलाय आणि त्याचा किती परिणाम झालाय, हे समजण्यासाठी पुरेसं आहे. विकी कौशलने त्याच्या मेहनतीच्या जोरावर रणवीर सिंगचा बाजीराव आणि गश्मिरने साकारलेले शंभूराजे हे काहीकाळ विस्मरणात नक्कीच घालवले आहेत. हा सहज सुंदर, धाडसी आणि मराठमोळ्या संस्कृतीची महती सांगणारा सिनेमा आहे. मुख्य म्हणजे विकी कौशल्य साकारलेल्या संभाजीमुळे अमोल कोल्हे यांचा संभाजी, आणि त्यांचा नकली चेहरा उघडा पडला आहे. अमोल कोल्हे यांनी शंभूराजांवरची मालिका साकारली होती, विकी कौशल्य केवळ तीन तासाच्या सिनेमात त्यांचे 'फेक नॅरेटिव्ह' चव्हाट्यावर आणले आहेत, खऱ्या अर्थाने हा अमोल कोल्हे यांचा आज पराभव म्हणावा लागेल, हे नक्की!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाबळेश्वरचे कांदाटी खोरे धोक्यात!

## विकासकामांसाठी उत्खनन; कारवाईची मागणी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पर्यावरणीयदृष्ट्या अतिसंवेदनशील असलेल्या साताऱ्यातील दुर्गम कांदाटी खोऱ्यात सध्या मोठ्या प्रमाणात डोंगरफोड सुरू आहे. या डोंगरांतून मिळणारा दगड, खडी, मुरुम आदींचा सर्रास वापर ठेकेदारांकडून विकासकामांसाठी केला जातो. खोऱ्यातीलच अहिर (ता. महाबळेश्वर) गाव हद्दीत अशाच प्रकारे डोंगर फोडत हजारो ब्रास गौण खनिज उत्खनन केल्याचे उघडकीस आले आहे. यातून वन, वन्यजीव कायद्याचे उल्लंघन होत असून, पर्यावरणप्रेमींकडून संबंधितांवर कारवाईची मागणी केली जात आहे.**



साताऱ्याच्या पश्चिमेस पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील (इको सेन्सेटिव्ह झोन) विभागामध्ये कोयना भागातील कांदाटी खोऱ्यात नवीन महाबळेश्वर प्रकल्पाचे प्रयोजन आहे. त्यामुळे या भागात रस्ते आणि अन्य (पान ४ वर) (पान १ वरून) विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या कामांसाठी लागणारे डबर, मुरुम, खडी, क्रशसॅण्ड आदींसाठी संबंधित ठेकेदारांकडून परिसरातीलच डोंगर फोडले जात आहेत. आधी वृक्षतोड, नंतर डोंगर फोडत त्यातून दगड, मुरुम बाहेर काढला जातो. त्यातून मिळणाऱ्या दगडावर या जंगलातच खडी तयार केली जाते.संवेदनशील भागांत मोठे विकास प्रकल्प राबवताना तेथील वन्यजीवांना खूप मोठ्या प्रमाणात धोका उत्पन्न होतो. या पार्श्वभूमीवरच नवीन महाबळेश्वर प्रकल्पाला विरोध होत आहे. परंतु हा प्रकल्प अस्तित्वात येण्याआधीच कांदाटी खोऱ्यातील ही डोंगरफोड समोर आली आहे. त्यामुळे या सर्व प्रकाराची चौकशी करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी पर्यावरणप्रेमींमधून होत आहे.अहिर खोऱ्यातील अहिर गावात डोंगर फोडत हजारो ब्रास गौण खनिज उत्खनन केल्याचे उघडकीस आले आहे. येथे रात्रंदिवस पोकलेन, ट्रॅक्टर, डम्पर आदींची वर्दळ सुरू आहे. त्यामुळे या प्रकाराला हरकत घेत, उत्खननासाठी कोणतीही परवानगी नसताना हे डोंगर कसे फोडले जात आहेत, त्यांना परवानगी कशी मिळते, असा प्रश्न स्थानिकांनी विचारला आहे. अत्यंत संवेदनशील अशा कांदाटी खोऱ्यातील अहिर गावाच्या हद्दीत सुरू केलेल्या दगडखाणींमुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान झाले आहे. या खोऱ्यातील जैवविविधतेवर गदा आली आहे. या खाणीसाठी कोणी परवानगी दिली, याचीही चौकशी झाली पाहिजे. संबंधित खाण बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे. पर्यावरणीयदृष्ट्या अतिसंवेदनशील असलेल्या साताऱ्यातील दुर्गम कांदाटी खोऱ्यात सध्या मोठ्या प्रमाणात डोंगरफोड सुरू आहे. या डोंगरांतून मिळणारा दगड, खडी, मुरुम आदींचा सर्रास वापर ठेकेदारांकडून विकासकामांसाठी केला जातो. खोऱ्यातीलच अहिर (ता. महाबळेश्वर) गाव हद्दीत अशाच प्रकारे डोंगर फोडत हजारो ब्रास गौण खनिज उत्खनन केल्याचे उघडकीस आले आहे. यातून वन, वन्यजीव कायद्याचे उल्लंघन होत असून, पर्यावरणप्रेमींकडून संबंधितांवर कारवाईची मागणी केली जात आहे.त्यामुळे या भागात रस्ते आणि अन्य (पान ४ वर) (पान १ वरून) विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या कामांसाठी लागणारे डबर, मुरुम, खडी, क्रशसॅण्ड आदींसाठी संबंधित ठेकेदारांकडून परिसरातीलच डोंगर फोडले जात आहेत. आधी वृक्षतोड, नंतर डोंगर फोडत त्यातून दगड, मुरुम बाहेर काढला जातो. त्यातून मिळणाऱ्या दगडावर या जंगलातच खडी तयार केली जाते

### कठोर कारवाईची मागणी

वन्यजीवांना खूप मोठ्या प्रमाणात धोका उत्पन्न होतो. या पार्श्वभूमीवरच नवीन महाबळेश्वर प्रकल्पाला विरोध होत आहे. परंतु हा प्रकल्प अस्तित्वात येण्याआधीच कांदाटी खोऱ्यातील ही डोंगरफोड समोर आली आहे. त्यामुळे या सर्व प्रकाराची चौकशी करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी पर्यावरणप्रेमींमधून होत आहे.अहिर खोऱ्यातील अहिर गावात डोंगर फोडत हजारो ब्रास गौण खनिज उत्खनन केल्याचे उघडकीस आले आहे. येथे रात्रंदिवस पोकलेन, ट्रॅक्टर, डम्पर आदींची वर्दळ सुरू आहे. त्यामुळे या प्रकाराला हरकत घेत, उत्खननासाठी कोणतीही परवानगी नसताना हे डोंगर कसे फोडले जात आहेत, त्यांना परवानगी कशी मिळते.

# सिंगल फेज योजनेचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन

## खासदार निलेश लंके यांनी लक्ष वेधताच दिल्लीचे अधिकारी पारनेरात !

। अहिल्यानगर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ग्रामीण भागातील घरगुती ग्राहकांना २४ तास वीज मिळावी यासाठी, गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित 'आरडीएसएस सिंगल फेज' योजनेचे काम पुर्ण करण्यात होणार्या दिरंगाईकडे खासदार निलेश लंके यांनी संसदेच्या उर्जा समितीच्या बैठकीत प्रश्न उपस्थित करताच केंद्रीय उर्जा समितीच्या अधिकाऱ्यांनी पारनेरमध्ये (अहिल्यानगर) धाव घेत या कामाचा आढावा घेतला.**



केंद्रीय उर्जा समितीचे सदस्य असलेल्या खासदार लंके यांनी समितीच्या बैठकीत सिंगल फेज योजनेसह महावितरणच्या कामातील दिरंगाईबद्दल तिव्र नाराजी व्यक्त केली होती. त्याची दखल घेत केंद्रीय उर्जा विभागाचे वरीष्ठ अधिकारी अहिल्यानगरमध्ये दाखल झाले. महावितरणच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना घेऊन ते पारनेरमध्ये गेले. खासदार लंके यांच्यासमवेत बैठक घेत विशेषतः सिंगल फेज योजनेचा आढावा घेतला.या प्रश्नासंदर्भात दिल्लीत सबंधित ठेकेदाराच्या उपास्थितीत बैठक घेऊन ठोस निर्णय घेण्याची ग्वाही केंद्रीय उर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. केंद्रीय उर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांसह अधीक्षक अभियंता रमेश पवार, अधीक्षक अभियंता श्री. ढोबळे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, उपभियंता हतोळकर यांच्यासह दिल्लीच्या पॉवर फायनान्स कार्पोरेशनचे अधिकारीही यावेळी उपस्थित होते.अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात आरडीएसएस योजेअंतर्गत सिगल फेज योजना राबविण्यासाठी ७०० कोटी रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला. दोन वर्षापूर्वी या योजनेची निविदा मंजुर झाली. मात्र हे काम करणाऱ्या ठेकेदाराकडे पुरेसे मनुष्यबळ अथवा सामुग्री नसल्याने हे काम रेंगाळल्याचे खा. लंके यांनी सांगितले.सिंगल फेज योजनेच्या प्रश्नावर दिल्ली येथे ठेकेदाराच्या उपास्थितीत बैठक घेण्यात येईल. या बैठकीत ठेकेदाराकडून तातडीने काम करण्याची हमी घेण्यात येईल, ठेकेदाराकडून त्यात कुचराई झाल्यास त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असेही या बैठकीत केंद्रीय उर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केल्याचे खासदार लंके यांनी सांगितले.

### घरगुती ग्राहकांना 24 तास वीज

अहिल्यानगरमध्ये अनेक भागात बिबटया तसेच अन्य वन्य प्राण्यांची संख्या मोठी असून त्यांच्यापासून शेतकऱ्यांना धोका आहे. सिंगल फेज योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदाराने कामाचा वेग वाढविला नाही तर त्यास काळ्या यादीत टाकण्याची सूचना लंके यांनी केली. ग्रामीण भागातील घरगुती ग्राहकांना २४ तास वीज मिळावी यासाठी, गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित 'आरडीएसएस सिंगल फेज' योजनेचे काम पुर्ण करण्यात होणार्या दिरंगाईकडे खासदार निलेश लंके यांनी संसदेच्या उर्जा समितीच्या बैठकीत प्रश्न उपस्थित करताच केंद्रीय उर्जा समितीच्या अधिकाऱ्यांनी पारनेरमध्ये (अहिल्यानगर) धाव घेत या कामाचा आढावा घेतला.

# व्यापार दुप्पट करण्यावर सहमती!

## पंतप्रधान मोदी, कतारचे अमिर यांची महत्त्वपूर्ण द्विपक्षीय चर्चा

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**भारत आणि कतारदरम्यानचा द्विपक्षीय व्यापार पुढील पाच वर्षांमध्ये दुप्पट करून २८ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य मंगळवारी निर्धारित करण्यात आले. तसेच दोन्ही देशांदरम्यानचे संबंध सामरिक भागीदारीच्या स्तरापर्यंत उंचावत असल्याचेही जाहीर करण्यात आले.**



### या मुद्द्यांवर चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी यांनी आज हैदराबाद हाऊस येथे विविध मुद्द्यांवर चर्चा केली. अन्न सुरक्षा आणि संस्कृतीक संबंधांवर लक्ष केंद्रित करून धोरणात्मक भागीदारीमध्ये वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली."कतारचे अमिर शेख तमिम बिन हमाद अल-थानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे महत्त्वपूर्ण द्विपक्षीय चर्चा झाली. त्यावेळी दोन्ही नेत्यांदरम्यान व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि सामान्य जनतेचा आपापसातील संपर्क यावर लक्ष केंद्रित करून द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्याचा निर्धार करण्यात आला.

कतारचे अमिर शेख तमिम बिन हमाद अल-थानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे महत्त्वपूर्ण द्विपक्षीय चर्चा झाली. त्यावेळी दोन्ही नेत्यांदरम्यान व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि सामान्य जनतेचा आपापसातील संपर्क यावर लक्ष केंद्रित करून द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्याचा निर्धार करण्यात आला. भारत आणि कतारदरम्यान मंगळवारी दोन करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. एक करार सामरिक भागीदारी करण्याविषयी आहे आणि दुसरा सुधारित दुहेरी कर टाळण्याचा करार आहे. त्याशिवाय आर्थिक भागीदारी मजबूत करणे, अभिलेखागारांचे व्यवस्थापन आणि युवा व्यवहार व क्रीडा प्रकारांमध्ये सहकार्य याविषयी पाच सामंजस्य करारही करण्यात आले.भारत व कतारदरम्यानचा सध्याचा द्विपक्षीय व्यापार १४ अब्ज डॉलर इतका असून तो पुढील पाच वर्षांमध्ये २८ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य पंतप्रधान मोदी आणि कतारचे अमिर यांनी निश्चित केल्याचे चॅटर्जी म्हणाले. पंतप्रधान मोदी यांच्या गेल्या वर्षीच्या कतार भेटीत भारताने कतारमधून पुढील २० वर्षे एलएनजी आयात करण्याचा ७८ अब्ज डॉलरचा करार केला होता. सामरिक भागीदारी करारामुळे दोन्ही देशांदरम्यानचे सध्याचे द्विपक्षीय संबंध सामरिक स्तरापर्यंत उंचावणार आहेत. व्यापार, ऊर्जा सुरक्षा तसेच प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर सहकार्य अधिक दृढ करण्यावर आमचा भर आहे.भविष्यामध्ये द्विपक्षीय मुक्त व्यापार करार (एफटीए) करण्यासाठी पंतप्रधान मोदी आणि कतारचे अमिर यांच्यादरम्यान चर्चा झाली अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सध्या भारत आणि आखात सहकार्य परिषदेदरम्यान (जीसीसी) 'एफटीए'साठी वाटाघाटी सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. 'जीसीसी'मध्ये संयुक्त अरब अमिराती, बहारिन, सौदी अरेबिया, ओमान, कतार आणि कुवैत या देशांचा समावेश आहे. भारत व कतारही 'एफटीए'ची शक्यता पडताळून पाहत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून, कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी यांनी १७-१८ फेब्रुवारी २०२५ रोजी भारताचा दौरा केला. यावेळी अमीर यांच्यासोबत त्यांचे मंत्री, अधिकारी आणि उद्योगपतींचा समावेश असलेले उच्चस्तरीय शिष्टमंडळही होते. पंतप्रधान मोदी यांनी १८ फेब्रुवारी रोजी हैदराबाद हाऊस येथे अमीर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी दोन्ही देशांनी 'द्विपक्षीय धोरणात्मक भागीदारी स्थापना करारा'वर स्वाक्षऱ्या केल्या. नव्याने स्थापित झालेल्या धोरणात्मक भागीदारीच्या पार्श्वभूमीवर, दोन्ही देशांनी राजकीय, व्यापार, गुंतवणूक, सुरक्षा, ऊर्जा, संस्कृती, शिक्षण, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि शाश्वतता यासह सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्य करण्याचे मान्य केले. तसेच यावेळी सुधारित दुहेरी कर टाळण्याच्या करारावरही स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी यांच्याशी बैठक झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत एक्सवर पोस्ट केली आहे. यामध्ये ते म्हणाले, "आज माझे बंधू, कतारचे अमीर, शेख तमीम बिन हमद अल थानी यांच्याशी बैठक झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली कतारने प्रगतीची नवी उंची गाठली आहे. ते भारत-कतारमधील मजबूत मैत्रीसाठी देखील वचनबद्ध आहेत. ही भेट आणखी खास आहे कारण आम्ही आमचे संबंध धोरणात्मक भागीदारीपर्यंत वाढवले आहेत." पतंप्रधान मोदी यांनी आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हटले की, "आमच्या चर्चेत व्यापाराचा मुद्दा प्रमुख होता. आम्हाला भारत-कतार व्यापार संबंध वाढवायचे आहेत आणि त्यामध्ये विविधता आणायची आहे. दोन्ही ऊर्जा, तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, अन्न प्रक्रिया, औषधनिर्माण आणि ग्रीन हायड्रोजन यासारख्या क्षेत्रातही एकत्र काम करू शकतात."दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी यांच्यात झालेल्या बैठकीबाबत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी एक्सवर सविस्तर माहिती दिली आहे. ते म्हणाले, "भारत आणि कतारमधील पारंपारिक संबंध अधिक दृढ झाले आहेत.

# महाकुंभ मृत्युकुंभ बनला : ममता बॅनर्जी

## श्रीमंत, व्हीआयपींसाठी 1 लाख रुपयांपर्यंतच्या तंबूंची तरतूद

**।प्रयागराज। वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्याबाबत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी वादग्रस्त विधान केले आहे. योगी आदित्यनाथ सरकारला लक्ष्य करत ममता बॅनर्जी पश्चिम बंगाल विधानसभेत म्हणाल्या की, "महाकुंभ आता मृत्यु कुंभ' बनला आहे.**



### चेंगराचेंगरीत 30 भाविकांचा मृत्यू

दोन दिवसांपूर्वी दिल्ली रेल्वे स्थानकावर प्रयागराजला जाणाऱ्या रेल्वे गाड्या पकडताना चेंगराचेंगरी होऊन काही भाविकांचा मृत्यू झाला होता. यानंतर बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय रेल्वे मंत्री लालू प्रसाद यादव यांनी महाकुंभ 'फालतू' असल्याचे म्हटले होते. याशिवाय, महाकुंभातील व्हीआयपी संस्कृतीवरून विरोधी पक्षांचे अनेक नेते योगी आदित्यनाथ सरकारवर सतत टीका करत आहेत.यंदाचा महाकुंभमेळा सुरू झाल्यापासून आतापर्यंत दोन वेळा चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या आहेत.

"महाकुंभमेळ्यात व्हीव्हीआयपींना विशेष सुविधा दिल्या जात आहेत, तर सामान्य लोकांना तिथे मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, असा आरोप त्यांनी यावेळी केला. महाकुंभात झालेल्या चेंगराचेंगरीवरून त्यांनी योगी सरकारला घेरत तेथे गर्दी नियंत्रित करण्यासाठी कोणतीही व्यवस्था केली नसल्याचे म्हटले आहे. पश्चिम बंगालच्या विधानसभेत बोलताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या, "हा 'मृत्युकुंभ' आहे. मी महाकुंभचा आदर करते, मी पवित्र गंगा मातेचा आदर करते पण तिथे कोणतीही व्यवस्था नाही. श्रीमंत, व्हीआयपींसाठी १ लाख रुपयांपर्यंतच्या तंबूंची तरतूद आहे. मात्र, गरिबांसाठी कुंभमेळ्यात कोणतीही व्यवस्था नाही. मेळ्यात चेंगराचेंगरीची परिस्थिती होणे सामान्य आहे, पण हे होऊ नये यासाठी योग्य व्यवस्था करणे महत्त्वाचे आहे. हे रोखण्यासाठी तुम्ही काय योजना आखल्या?"पश्चिम बंगाल विधानसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान बोलताना, ममता बॅनर्जी यांनी प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभमेळ्याच्या कथित गैरव्यवस्थापनाबद्दल भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार आणि उत्तर प्रदेश सरकारवर कठोर शब्दांत टीका केली.

# प्रसिद्ध गायकाने गर्लफ्रेंडशी बांधली लग्नगाठ



मनोरंजनसृष्टीतील अनेक कलाकार सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या संपर्कात असतात. हे सेलेब्रिटी त्यांच्या आयुष्यातील खास क्षण त्यांच्या चाहत्यांबरोबर शेअर करताना दिसतात. आता 'हुस्न' आणि 'जो तुम मेरे हो' सारख्या गाण्यांना आवाज देऊन लोकांची मने जिंकणारा आणि ब्रेकअपच्या गाण्यांसाठी ओळखला जाणारा गायक अनुव जैन(ANUV JAIN) विवाहबंधनात अडकला आहे. कुटुंब व इतर जवळच्या लोकांच्या उपस्थितीत या गायकाने लग्नगाठ बांधली आहे.या विवाह सोहळ्यातील काही फोटो इंस्टाग्रामवर शेअर केले आहेत.अनुवने त्याची गर्लफ्रेंड हृदि नारंगशी लग्न केले आहे. हे फोटो शेअर करताना त्याने, "और यहाँ देखो कैसी आयी दो दिलों की बारात है", अशी कॅप्शन दिली आहे. रेडिटनुसार अनुवने १४ फेब्रुवारी २०२५ ला दिल्लीमध्ये लग्नगाठ बांधली. त्यांच्या शाही लग्नाच्या लूकने सर्वांची मने जिंकल्याचे पाहायला मिळत आहे. एवढेच नाही तर लोकांना या जोडप्याचे लग्नापूर्वीचे फोटोही आवडले. ज्यामध्ये हृदिचे लेहेंगा तसेच शरारामध्ये फोटो पाहायला मिळत आहेत. अनुवने सोनेरी रंगाची शेरवानी घातल्याचे पाहायला मिळत आहे. अनुवच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. काहींनी त्याच्या ब्रेकअप गाण्यांवर विनोद करीत त्याने आता लग्न केल्याचे म्हटले आहे.दरम्यान, अनुव जैनने २०२२ मध्ये हिंदुस्तान टाइम्सला मुलाखत दिली होती. यामध्ये त्याने तो रिलेशनशिपमध्ये असल्याचे म्हटले होते. मात्र, त्याबद्दल त्याने कोणताही खुलासा केला नव्हता. पुढे बघूयात काय होतंय, असे त्याने म्हटले होतेय. या मुलाखतीत त्याने त्याच्या मजाक या गाण्याविषयी बोलताना म्हटले होते की मजाक हे गाणे प्रेमावर आधारित आहे. हे गाणे प्रेमावर भाष्य करते. जेव्हा तुम्ही प्रेमात पडाल, अशी कमी अपेक्षा ठेवता. तेव्हा तुम्ही अचानक प्रेमात पडता. हे माझ्या वैयक्तिक अनुभवानुसार मी सांगत आहे, असे त्याने म्हटले होते. आता मात्र त्याने त्याच्या गर्लफ्रेंडशी लग्न करून सर्वांना सुखद धक्का दिला आहे.

# शिवजयंती निमित्ताने विकी कौशलची घोषणा!

अभिनेता विकी कौशल सध्या 'छावा' चित्रपटामुळे सर्वत्र चर्चेत आहे. त्याने सिनेमात साकारलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेचं सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. चित्रपट समीक्षक असो किंवा प्रेक्षक सगळेजण विकीचा अभिनय पाहून गहिवरल्याचं व्हायरल व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. विकी कौशल सध्या 'छावा'च्या निमित्ताने अनेक ठिकाणी प्रमोशन, मुलाखतींना उपस्थिती लावताना दिसतोय. यादरम्यान त्याने चित्रपट प्रदर्शित झाल्यावर सर्वात आधी रायगडावर जायचंय असं म्हटलं होतं. अखेर अभिनेता त्याचा हा शब्द पाळणार आहे, विकी कौशल १९ फेब्रुवारीला शिवजयंतीच्या निमित्ताने किल्ले रायगडावर जाणार आहे. याबाबत विकीने व्हिडीओ शेअर करत सर्वांना माहिती दिली आहे.१९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. शिवप्रेमी यानिमित्ताने विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करतात. ढोल-ताशाच्या गजरात मिरवणुका काढल्या जातात, महाराजांच्या गड-किल्ल्यांचं संवर्धन व्हावं यासाठी तरुणपिढीला मार्गदर्शन केलं जातं. अशाप्रकारे हा शिवजयंती उत्सव विविध भागात साजरा केला जातो. याशिवाय स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावर सुद्धा विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. याठिकाणी शिवप्रेमींसह बरेच मान्यवर शिवजयंतीला उपस्थित असतात. यंदा बॉलीवूड अभिनेता विकी कौशल सुद्धा महाराजांना वंदन करण्यासाठी रायगडावर जाणार आहे.नमस्कार, उद्या १९ फेब्रुवारी आहे... आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने मी स्वराज्याच्या राजधानीत म्हणजेच रायगडावर जात आहे. आपलं दैवत छत्रपती शिवाजी महाराजांना नमन करूयात, त्यांचा आशीर्वाद घेऊयात आणि छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती जल्लोषाने साजरी करूयात. जय जिजाऊ, जय शिवराय, जय शंभूराजे!" असा व्हिडीओ इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर करत विकीने रायगडावर येणार असल्याची घोषणा केली आहे.दरम्यान, विकी कौशलच्या 'छावा' सिनेमाबद्दल सांगायचं झालं, तर या चित्रपटाने १४ फेब्रुवारीला प्रदर्शित झाल्यापासून अवघ्या ४ दिवसांत बॉक्स ऑफिसवर १४५ कोटींचा गल्ला जमावला आहे. सध्या 'छावा'ला सिनेमागृहांमध्ये तुफान प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये विकीसह रश्मिका मंदाना, आशुतोष राणा, अक्षय खन्ना, विनीत सिंह, दिव्या दत्ता, डायना पेंटी, संतोष जुवेकर या कलाकारांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.



# पूजा रोहन ला करतेय डेट?

अभिनेत्री पूजा हेगडे बॉलीवूड आणि दाक्षिणात्य इंडस्ट्रीमधून जगभरात आपली ओळख निर्माण केली. आपल्या व्यावसायिक आयुष्याबाबत जेवढी ती उघडपणे बोलते तितकंच आपलं वैयक्तिक आयुष्य तिला खासगी ठेवायला आवडतं. अशातच पूजा हेगडे तिच्या कथित बॉयफ्रेंड रोहन मेहराबरोबर पुन्हा एकदा दिसली. वांद्रे येथे एकत्र फिरताना पापाराझींनी त्यांचे फोटोज काढले, त्या वेळेस दोघंही एकाच कारमध्ये होते. यावेळी पूजानं सफेद रंगाचा शर्ट, ग्रे ट्राउजर व काळे बूट घातले होते; तर रोहननं काळ्या रंगाचा टी-शर्ट, निळी पॅन्ट व सफेद शूज, असा कॅज्युअल लूक केला होता. पूजा हेगडे गेल्या काही दिवसांपासून रोहनला डेट करीत असल्याची चर्चा सुरू आहे. रोहन दिवंगत अभिनेते विनोद मेहरा यांचा मुलगा आहे. रोहननं २०१८ मध्ये सैफ अली खानबरोबर 'बाजार' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. रोहनचं नाव याआधी तारा सुतारियाबरोबर जोडलं गेलं होतं. तथापि, मे २०१९ मध्ये दोघे विभक्त झाल्याची माहिती समोर येऊ लागली.२०२३ मध्ये पूजा एका क्रिकेटरला डेट करत आहे आणि लवकरच ती त्याच्याशी लग्न करणार आहे अशा चर्चांना उधाण आलं होतं. तथापि, 'द फ्री प्रेस जर्नल'नं दिलेल्या वृत्तानुसार, अभिनेत्रीनं या अफवा खोडून काढल्या आणि जाहीर केलं की, त्या खोट्या आहेत.दरम्यान, पूजाच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर पूजा सलमान खानबरोबर 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटामध्ये शेवटची दिसली होती. फरहाद सामजी दिग्दर्शित या चित्रपटात व्यंकटेश दग्गुबती, जगपती बाबू, भूमिका चावला, विजेंदर सिंग, अभिमन्यू सिंग, राघव जुयाल, सिद्धार्थ निगम, जस्सी गिल, शहनाज गिल, पलक तिवारी व विनाली भटनागर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# जिजाजींना नाही आणलं का?



अदिती राव हैदरीने अभिनेता सिद्धार्थबरोबर साखरपुडा केला आहे. साखरपुड्यानंतर पहिल्यांदाच शनिवारी ती मुंबई विमानतळावर दिसली. सिद्धार्थशी साखरपुडा केल्यानंतर पहिल्यांदाच ती सार्वजनिक ठिकाणी दिसली. अदितीने एअरपोर्ट लूकसाठी डेनिम शर्टसह लेयर्ड को-ऑर्डर सेट घातला होता. ती खूप छान दिसत होती. यावेळी एका पापाराझीने तिला सिद्धार्थबद्दल विचारलं. त्यावर अदिती लाजताना दिसली. अदितीला पापाराझीने सिद्धार्थबद्दल विचारलं. "सरांना नाही आणलं का? माफ करा, जिजाजींना नाही आणलं का?" असं विचारल्यावर अदिती लाजत हसू लागली. नंतर तिने सांगितलं की सिद्धार्थ तिच्याबरोबर आला नसून कामानिमित्त दुसरीकडे गेला आहे.

# दिशा बदला घेण्यासाठी काय करणार?

शरयू सोनावणे व प्रसाद जवादे यांची प्रमुख भूमिका असलेली पारू(PAARU) ही मालिका सध्या लोकप्रिय ठरत असल्याचे दिसत आहे. शरयूने या मालिकेत पारू ही भूमिका साकारली आहे. तर प्रसाद आदित्य या भूमिकेत दिसत आहे. काही दिवसांपूर्वीच दिशाची मालिकेत पुन्हा एन्ट्री झाली आहे. पुन्हा येताच तिने अहिल्यादेवीला खुले आव्हान दिल्याचे पाहायला मिळाले. आता किर्लोस्कर कुटुंबाविरूद्ध कट कारस्थान करत असल्याचे दिसत आहे. आता पारू या मालिकेचा एक प्रोमो समोर आला आहे.झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर 'पारू' या मालिकेचा एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की, दिशा व अनुष्का यांच्यात संवाद सुरू आहे. अनुष्का दिशाला म्हणते की तू बाहेरून वार करतच आहेस, मी आतून घर पोखरते. आता यापुढे मी असा प्लॅन करेल. ज्यामुळे या किर्लोस्कर कुटुंबातील एकही माणूस जिवंत राहणार नाही. दुसरीकडे सावित्री पारूला म्हणते की आपल्याला अहिल्या मॅडमला सगळं सांगायला हवं. पारू म्हणते, किर्लोस्कर कुटुंबावर वार करण्याआधी त्यांना माझ्या सामना करावा लागेल.



दिशा व अनुष्का या दोघी बहिणी

# पाकिस्तानची पुन्हा आगळीक!

## चॅम्पियन्स ट्रॉफी खेळणाऱ्या देशांच्या रांगेतून भारताचा ध्वज गायब

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारत खेळणार की नाही? यावर राजकीय स्तरावर बरीच चर्चा पाहायला मिळाली. पाकिस्तानमध्ये भारतीय संघ क्रिकेट खेळण्यासाठी जाणार नाही, अशी ठाम भूमिका भारत सरकारनं घेतली होती. त्यावर आधी पाकिस्तान क्रिकेट बोर्ड व पाकिस्तानच्या माजी खेळाडूंनीही टीका-टिप्पणी केली होती.**

त्यावरून बराच खल झाल्यानंतर अखेर चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील टीम इंडियाचे सामने दुबईला हलवण्यात आले, एवढंच नव्हे, तर भारत जर सेमीफायनल किंवा फायनलमध्ये पोहोचला, तर हे सामनेदेखील पाकिस्तानऐवजी दुबईमध्ये खेळवले जाणार आहेत. पण एकीकडे सुरक्षेच्या कारणावरून भारतानं ही भूमिका घेतली असताना दुसरीकडे आता पाकिस्तानच्या एका कृतीची सोशल मीडियावर जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे.गेल्या दोन दिवसांपासून सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ पाकिस्तानच्या कराची स्टेडियमवरचा असल्याचं सांगितलं जात आहे. शिवाय, चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी हे मैदान तयार करण्यात आल्यानंतरचा हा व्हिडीओ असल्याचंही सांगितलं जात आहे. नियमानुसार, स्पर्धेत जे संघ खेळणार असतील, त्या सर्व संघांचे ध्वज स्टेडियमवर लावले जातात. पण कराची स्टेडियमवर चॅम्पियन्स ट्रॉफी खेळणाऱ्या इतर सर्व संघांचे ध्वज लावण्यात आले असले, तरी भारताचा तिरंगा या देशांच्या रांगेत दिसत नाहीये.हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर




पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या (PCB) या वृत्तीवर टीका केली जात आहे. सोशल मीडियावर पाकिस्तानला लक्ष्य केलं जात आहे. या स्टेडियमवर भारताचा तिरंगा का लावला नाही? असा प्रश्न पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला केला जात आहे. यासंदर्भात आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं सविस्तर वृत्त दिलं आहे.सूत्रांच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तानुसार, पाकिस्तान क्रिकेट बोर्डानं यासाठी आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या नियमाचं कारण दिलं आहे. “आयसीसीनं सामना असलेल्या मैदानावर फक्त चारच ध्वज लावण्याचा सल्ला दिला आहे. खुद्द आयसीसीचा (स्पर्धेचे आयोजक), पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचा (स्पर्धेचे यजमान) आणि ज्या दोन देशांमध्ये सामना होत आहे, त्या दोन देशांचे ध्वज लावावेत असं सांगितलं गेलं आहे”, अशी माहिती पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या प्रवक्त्याने माध्यमांना नाव न सांगण्याच्या अटीवर दिली आहे.दरम्यान, दुसरीकडे IANS वृत्तसंस्थेनं याबाबत PCB च्या पदाधिकाऱ्याच्या हवाल्याने दिलेल्या वृत्ताचा उल्लेख इंडियन एक्स्प्रेसनं केला आहे. “तुम्हाला माहिती आहे की भारत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेचे त्यांचे सामने खेळण्यासाठी पाकिस्तानमध्ये येत नाहीये. त्यामुळे नॅशनल स्टेडियम कराची, रावळपिंडी क्रिकेट स्टेडियम आणि गडाफी स्टेडियम लाहोर यांनी त्या ठिकाणी स्पर्धेदरम्यान खेळणाऱ्या देशांचे ध्वज लावले आहेत”, असं या पदाधिकाऱ्याने सांगितलं.तब्बल

### सोशल मीडियावर जोरदार चर्चा

१८ फेब्रुवारी रोजी टीम इंडियाचा पहिला सामना बांगलादेशविरोधात असून रविवारी २३ फेब्रुवारी रोजी दुसरा सामना यजमान पाकिस्तानविरोधात आहे. या सामन्यासाठी पाकिस्तानचा संघ दुबईला येणार आहे. शेवटच्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत पाकिस्तान विजयी ठरला होता. त्यावरून बराच खल झाल्यानंतर अखेर चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील टीम इंडियाचे सामने दुबईला हलवण्यात आले, एवढंच नव्हे, तर भारत जर सेमीफायनल किंवा फायनलमध्ये पोहोचला, तर हे सामनेदेखील पाकिस्तानऐवजी दुबईमध्ये खेळवले जाणार आहेत. पण एकीकडे सुरक्षेच्या कारणावरून भारतानं ही भूमिका घेतली असताना दुसरीकडे आता पाकिस्तानच्या एका कृतीची सोशल मीडियावर जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे.गेल्या दोन दिवसांपासून सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

# मुंबईने विजयाचे खाते उघडत घडवला इतिहास!

## सलग पाचव्या सामन्यात गुजरात जायंट्सचा उडवला धुव्वा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सने गुजरात जायंट्सवर ५ विकेट्सनी विजय मिळवत डब्ल्यूपीएल २०२५ मधील विजयाचे खाते उघडले. या सामन्यात मुंबई इंडियन्स नाणेफेक जिंकून गुजरात जायंट्सला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. यानंतर मुंबई इंडियन्स गुजरात १२० धावांवर गारद केले. गुजरातसाठी हरलीने सर्वाधिक धावांचे योगदान दिले. तसेच मुंबईकडून हेली मॅथ्यूजने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. मुंबईने १६.१ षटकांत ५ गडी गमावून नॅट सिव्हर ब्रंटच्या अर्धशतकाच्या जोरावर १२२ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला.**

यासह मुंबईने डब्ल्यूपीएलमधील इतिहासातील गुजरातविरुद्ध सलग पाचवा विजय नोंदवला आहे.हा सामना वडोदऱ्यातील कोटाम्बी स्टेडियमवर खेळला गेला, ज्यामध्ये मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबईचा निर्णय योग्य ठरला. कारण गुजरातने ४३ धावा केल्या तोपर्यंत त्यांचा अर्धा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. बेथ मूनी, लॉरा वोल्वार्ड आणि ॲशले गार्डनर सारख्या मोठ्या खेळाडू मुंबईच्या घातक गोलंदाजीला बळी पडल्या. एकेकाळी गुजरातने ७९ धावांवर ७ विकेट गमावल्या होत्या. येथून, हरलीन देओल आणि तनुजा कंवर यांनी मिळून गुजरातचा स्कोअर १०० च्या पुढे नेला.मुंबई इंडियन्सच्या हेली मॅथ्यूजने या हंगामात पहिल्यांदाच पर्पल कॅपवर दावा केला आहे.

मॅथ्यूजने डब्ल्यूपीएल २०२५ च्या दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या



तिच्या पहिल्या सामन्यात २ विकेट्स घेतल्या होत्या. आता तिने गुजरात जायंट्सविरुद्ध ३ विकेट्स घेत पर्पल कॅपवर दावा आहे. तिने या हंगामात आतापर्यंत ५ विकेट्स घेतल्या आहेत आणि सर्वाधिक विकेट्स घेण्याच्या बाबतीत रेणुका ठाकूरची बरोबरी केली आहे. पण इतर आकडेवारीच्या आधारे, मॅथ्यूज पुढे आहे.

डब्ल्यूपीएलच्या पहिल्या हंगामातील विजेत्या मुंबई इंडियन्सला डब्ल्यूपीएल २०२५ मधील पहिल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध २ विकेट्सनी पराभव पत्करावा लागला होता. सध्या तो हंगामातील त्याच्या पहिल्या विजयाच्या शोधात आहे. नॅट सिव्हर ब्रंटच्या अर्धशतकाच्या जोरावर मुंबई इंडियन्सने गुजरात जायंट्सचा पाच विकेट्सने पराभव केला. मंगळवारी वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करणाऱ्या गुजरातला २० षटकांत १० गडी गमावल्यानंतर केवळ १२० धावा करता आल्या. प्रत्युत्तरात, मुंबईने १६.१ षटकांत पाच गडी गमावून १२२ धावा केल्या आणि २३ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला.

या विजयासह मुंबई संघ पॉइंट्स टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. त्यांचा नेट रन रेट ०.७८३ पर्यंत वाढला आहे तर गुजरात जायंट्स तीन सामन्यांत एक विजय आणि दोन पराभवांसह तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. सध्या, स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखालील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ अव्वल स्थानावर आहे, त्यांनी आतापर्यंत खेळलेले दोन्ही सामने जिंकले आहेत. दिल्ली आणि यूपी वॉरियर्स अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या स्थानावर आहेत.

### बंगळुरू संघ अव्वल स्थानावर

ज्यामध्ये मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबईचा निर्णय योग्य ठरला. कारण गुजरातने ४३ धावा केल्या तोपर्यंत त्यांचा अर्धा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. बेथ मूनी, लॉरा वोल्वार्ड आणि ॲशले गार्डनर सारख्या मोठ्या खेळाडू मुंबईच्या घातक गोलंदाजीला बळी पडल्या. एकेकाळी गुजरातने ७९ धावांवर ७ विकेट गमावल्या होत्या. येथून, हरलीन देओल आणि तनुजा कंवर यांनी मिळून गुजरातचा स्कोअर १०० च्या पुढे नेला.मुंबई इंडियन्सच्या हेली मॅथ्यूजने या हंगामात पहिल्यांदाच पर्पल कॅपवर दावा केला आहे. मॅथ्यूजने डब्ल्यूपीएल २०२५ च्या दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या तिच्या पहिल्या सामन्यात २ विकेट्स घेतल्या होत्या.

## शहराच्या विकासाच्या अनुषंगाने प्रकल्प

# महापालिका 200 कोटींचे हरित कर्जरोखे उभारणार!

### डॉ. नीलम गोऱ्हे; "एमआयटीवर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी" येथे 'क्षमता बळकटीकरण समारंभ

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शहरातील कार्बन उत्सर्जन, वाहतूक कोंडी कमी करणे, सायकल मार्गिका विकसित करणे, पादचाऱ्यांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी महापालिका २०० कोटी रुपयांचे हरित कर्ज उभारणार आहे. हे कर्जरोखे उभारण्यासाठी राज्य शासनाने परवानगी दिली आहे.**



शहराच्या विकासाच्या अनुषंगाने पर्यावरण तसेच हवामान बदल यामध्ये सकारात्मक योगदान देणाऱ्या प्रकल्पांसाठी हरितकर्ज रोखे उभारण्यात येणार आहे. महापालिकेला हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीकोनातून हरित रोख्यांमध्ये समावेश असणाऱ्या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता होती. दोनशे कोटींचे हरित कर्ज रोख्यांची उभारणी करण्यासाठी नऊ जुलै २०२४ मध्ये स्थायी समिती आणि १६ जुलै २०२४ रोजी सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती. त्यानंतर याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला होता. या प्रस्तावाला राज्य शासनाने मान्यता दिली आहे. महापालिकेच्या कर्जरोखे उभारण्याच्या प्रस्तावास प्रतिष्ठित क्रिसिल (सीआरआयएसआयएल) कडून 'एएप्लस' स्थिर मानांकन मिळाले आहे. त्यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचा दाखला प्राप्त झाला आहे. हरित कर्ज रोख्यांमधून उभारलेल्या निधीतून महापालिका निगडी, प्राधिकरण परिसरातील हरित सेतूचे कार्यालय, 'नॉन-मोटराइज्ड ट्रान्सपोर्टेशन' योजना राबविणार आहे. तसेच महापालिकेला आवश्यक वाटणारे हरित प्रकल्प हाती घेतले जाणार आहेत.

#### कर्जरोखे घेण्यासाठी अटी-शर्ती

कर्जरोख्यांच्या परतफेडीसाठी महापालिकेने राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून परतफेड वेळेत होईल, याची दक्षता घ्यावी

रोख्यांद्वारे उभारण्यात येणारी कर्ज रक्कम आणि त्यावरील व्याज परतफेडीची जबाबदारी महापालिकेची असून, शासनाची कोणतीही हमी राहणार नाही

कर्जरोख्यांची उभारणी व त्याची परतफेड याबाबतचा अहवाल महापालिकेने वेळोवेळी शासनास सादर करावा

ज्या प्रयोजनासाठी कर्जरोखे उभारण्यात येणार आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करावा, प्रकल्पाच्या मान्यतेनंतर सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

दोनशे कोटी रकमेच्या मर्यादेत कर्ज उभारण्यास शासनाची ना हरकत असली तरी, कर्जाची प्रत्यक्ष उचल आवश्यकतेनुसार करण्यात यावी

हरित कर्जरोखे उभारणारी राज्यातील पहिलीच महापालिका आहे. यासाठी केंद्र सरकार २० कोटींचा प्रोत्साहन निधी देणार आहे. हरित कर्ज रोख्यांमधून उभारलेला निधी शहराच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

---

# शहरातील सर्व पोलीस स्टेशनचे कामकाज नेहरूनगर न्यायालयात वर्ग होणार!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील हिंजवडी, रावेत, दिघी, देहूरोड, भोसरी आणि वाकड या पोलिस ठाण्यांचे संपूर्ण कामकाज लवकरच नेहरूनगर न्यायालयात वर्ग होणार आहे. या निर्णयासाठी आमदार महेश लांडगे आणि पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या पाठपुराव्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळालेला आहे.**




आमदार महेश लांडगे, पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, ॲड मंगेश खराबे ,सचिव रीना मगदूम ,ॲड खंदारे, ॲड कोकणे यांनी मुख्यमंत्री फडणवीस साहेब यांची नुकतेच शहरातील विविध विकास कामांच्या उद्घाटनानिमित्ताने आले असता आमदार महेश लांडगे यांच्यामाध्यमातून भेट घेतली व निवेदन दिले. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी लवकरच पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व पोलिस ठाण्यांचे कामकाज नेहरूनगर न्यायालयात वर्ग करण्यासंबंधी आश्वस्त केले.

पूर्वी पिंपरी-चिंचवड शहरातील न्यायप्रविष्ठ बाबी मोरवाडी न्यायालयातून चालत होत्या, मात्र आता नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडियम समोरील नवीन सुसज्ज इमारतीमध्ये न्यायालय स्थलांतरित झाले आहे. याठिकाणी १० न्यायाधीशांची नेमणूक केली गेली आहे आणि लवकरच २ नवीन दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) आणि न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग न्यायालय) यांची नियुक्ती होणार आहे.

सध्या हिंजवडी, देहुरोड, भोसरी आणि वाकड पोलिस स्टेशनचे कामकाज पुणे, खडकी आणि वडगाव मावळ न्यायालयात चालते. यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचविण्यासाठी तसेच न्यायालयीन प्रक्रिया सोयीस्कर होण्यासाठी नेहरूनगर न्यायालयात हे कामकाज वर्ग करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे नागरिकांच्या प्रवासाचा वेळ कमी होईल आणि प्रशासनाच्या कामकाजामध्ये गती येईल.



"पिंपरी-चिंचवड शहरातील हिंजवडी, रावेत, दिघी, देहूरोड, भोसरी, वाकड या पोलिस स्टेशनचे काही कामकाज सध्या पुणे, खडकी व वडगाव न्यायालयांत होत असल्यामुळे नागरिकांचा,वकिलांचा वेळ आणि पैशांचा मोठा अपव्यय होत आहे. आता या कामकाजाचे पिंपरी नेहरूनगर न्यायालयात वर्ग झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे."

**– महेश लांडगे,**
आमदार भोसरी विधानसभा,भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

"पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन व आमदार महेश लांडगे यांच्या यशस्वी पाठपुराव्याने जर पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व पोलिस ठाण्यांचे कामकाज नेहरूनगर न्यायालयात वर्ग झाले तर निश्चितच शहरातील नागरिकांना न्यायव्यवस्थेची प्रक्रिया आणखी सुलभ होईल."

**–ॲड. मंगेश खराबे,** ॲडव्होकेट.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

EDUCATING MIND & HEART

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

Holistic
Empowering
Learning

IT ALL STARTS HERE



42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+ NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+ CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+ 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+ TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+ 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# प्रसंग आल्यावर प्रतिकार हा केलाच पाहिजे !

## दुर्गा भोर : निर्भय कन्या अभियान अंतर्गत महिलांचे स्वसंरक्षण व प्रात्यक्षिके कार्यशाळा

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**चिंचवड येथील कमला शिक्षण संकुल संचलित संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा व संस्थेच्या खजिनदार डॉ . भूपाली शहा यांच्या सुचना व मार्गदर्शनानुसार प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांच्या संयोजन व अध्यक्षतेखाली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालयांच्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने निर्भय कन्या अभियान अंतर्गत महिलांचे स्वसंरक्षण व प्रात्यक्षिके कार्यशाळेचे उद्घाटन दुर्गा ब्रिगेड संघटनेच्या अध्यक्षा दुर्गा भोर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले यावेळी संघटनेच्या कायदेशीर सल्लागार अँड. मोहिनी सूर्यवंशी, इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर , महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम, विद्यार्थी कल्याण मंडळाच्या प्रमुख प्रा. गीता कांबळे, अवंतिका भोर आदी उपस्थित होते.**



शिक्षणशास्त्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य दुर्गा ब्रिगेड संघटनेच्या अध्यक्षा दुर्गा भोर पुढे म्हणाल्या, कमला शिक्षण संकुलाचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शाह सुरक्षेबाबत मोहीम राबवित आहे ही अभिमानाची बाब आहे. ही चळवळ सर्वत्र तळागाळात पोहोचली पाहिजे. देशभरात विविध क्षेत्रात महिलांनी प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली आहे व आजही पार पाडीत आहे. आजची महिला सक्षम आहे परंतु प्रसंगात एक पाऊल पुढे टाकण्यात कधी कधी कच खातात. प्रसंगी प्रतिकार हा प्रत्येकाने केलाच पाहिजे. त्यासाठी प्रथम कायदे देखील समजावून घेतले पाहिजे. आज ही मुलींना मारहाण, छेडछाड, जाळून मारले जातात. भारतीय संविधानात कायदे आहेत पळवाट देखील आहेत.

आर्थिक फसवणूक, मोबाईलवर स्क्रीन शॉट काढून छेडछाड , आदीत महिला, विद्यार्थींना अनेक प्रसंगाला सामोरे जाण्याची वेळ आलीच तर घाबरून न जाता न्याय, हक्कासाठी प्रत्येकाने झगडले पाहिजे. कुणाला मदत हवी असेल तर आमची संघटना सदैव आपल्या पाठीशी असेल, अतिप्रसंगाची घटना महिलांवर घडलीच तर त्वरीत एक पाऊल पुढे टाकून प्रथम नजीकच्या पोलीस चौकीत जावून रीतसर तक्रार नोंदविण्याचे आवाहन करून प्रत्येकाने स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेण्याचे आवाहनही यावेळी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा व प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थिताना स्वसंरक्षण कसे करावयाचे , प्रसंगावधान राखून प्रतिकार कसा करावयाचा यांची प्रात्यक्षिके अवंतिका भोर व तिच्या सहकाऱ्यांनी करून दाखविले.

कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. गीता कांबळे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय विद्यार्थिनी अपेक्षा स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन शीतल डुंबरे यांनी तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.